# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## जाहिरात क्र.1/2015 सरळसेवा भरती घटकसंवर्ग

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील खाली नमुद केलेल्या धुळे विभागाकरीता सध्याच्या व भविष्यात रिकाम्या जागा विचारात घेवून कारागीर-क [कनिष्ठ] व सहाय्यक [क] पदाकरीता अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र बी सी सी2013/प्र.क्र 354 / भाग-2 /2013 /16-ब दिनांक 21.2.2015 व शासन निर्णय क्र बी सी सी- 2014/प्र.क्र 216-ए/2014/16-ब दिनांक 2.3.2015 अन्वये शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागास प्रवर्गाअतर्गत मराठा समाजास 16% व विशेष मागास प्रवर्ग -अ अतर्गत 5% सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामध्ये आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी दिनांक 14.11.2014 पासून स्थगित करण्यात आली आहे. व दिनांक 14.11.2014 नंतरच्या भरतीकरीता पुर्वी विहित केलेल्या 100 बिंदु नामावलीचा वापर करुन पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर जाहिरात देण्यात येत आहे.

उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी सदर जाहिरातीत देण्यात आलेली माहिती, सूचना, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचाव्यात.

[1] पदाकरीता भरावयाच्या पदांची सामाजिक व समांतर आरक्षणानुसार संख्या

### अ) कारागिर ''क'' (कनिष्ठ)

### धुळे विभाग

| क्र. | तपशील | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण | व्यवसाय (Trade) व संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| | भरावयाची पदसंख्या | 4 | 10 | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 5 | 7 | 30 | यांत्रिक 14<br>विजतंत्री 5 |
| 1 | महिला(30%) | 1 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 7 | वाहनपरीक्षक 4 |
| 2 | माजी सैनिक (15%) | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | बॉडीफिटर 5 |
| 3 | अंशकालीन (10%) | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | टिनस्मिथ-1 |
| 4 | प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | पेंटर-1 |
| 5 | भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | एकुण-30 |
| 6 | खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 7 | इतर | 3 | 5 | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 2 | 3 | 17 | |
| | एकुण | 4 | 10 | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 5 | 7 | 30 | |

# (ब) सहाय्यक (कनिष्ठ)

## धुळे विभाग

| क्र. | तपशील | अजा | अज | विजा व भज | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण | व्यवसाय (Trade) व संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| | भरावयाची पदसंख्या | 15 | 41 | 6 | 5 | 6 | 4 | 4 | 17 | 90 | 188 | 1. मोटार मॅकेनिक-<br>2. शिटमेटल<br>3. ॲटो इले./ इलेक्ट्रीशियन<br>4. टीनस्मिथ/ वेल्डर<br>5. पेंटर-<br>6. डिझेल मॅकेनिक -<br>7. ब्लॅकस्मिथ |
| 1 | महिला(30%) | 4 | 11 | 2 | 1 | 2 | 1 | 1 | 5 | 25 | 52 | |
| 2 | माजी सैनिक (15%) | 2 | 6 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 12 | 27 | |
| 3 | अंशाकालीन (10%) | 1 | 4 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 9 | 17 | |
| 4 | प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | 7 | |
| 5 | भूकंपग्रस्त (2%) | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 3 | |
| 6 | खेळाडू (5%) | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | 7 | |
| 7 | इतर | 6 | 15 | 3 | 3 | 2 | 2 | 2 | 6 | 36 | 75 | |
| | एकुण | 15 | 41 | 6 | 5 | 6 | 4 | 4 | 17 | 90 | 188 | |

(2) समांतर आरक्षण :-

(अ) महिलांसाठी आरक्षणः- शासन नियमानुसार एकूण पदाच्या 30 टक्के इतके समांतर आरक्षण आहे.

(ब) माजी सैनिक आरक्षणः- शासन नियमानुसार एकूण पदांच्या 15टक्के इतके समांतर आरक्षण राहील.

(क) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्तः- शासन निर्णयानुसार एकूण पदांच्या 7 टक्के इतके समांतर आरक्षण राहील. (भुकंपग्रस्त 2 टक्के व प्रकल्पग्रस्त 5 टक्के )

(ड) खेळाडू आरक्षणः- राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंकरीता 5 टक्के आरक्षण राहील.

(इ) शासन सेवेतील अंशाकालीन कर्मचारीः- शासन निर्णयानुसार 10 टक्के इतके समांतर आरक्षण राहील.

उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे इतर उमेदवारांमधुन भरण्यात येतील तसेच समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते.

(3) संबंधित पदासाठी विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता / अनुभव / शारिरीक पात्रता/ वयोमर्यादा इत्यादीचा तपशील

## अ) कारागिर ''क''(कनिष्ठ)

### धुळे विभाग

1) वेतनश्रेणी :-- पहिल्या 3 वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी ' 4075-4454/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते, प्रतिवर्षी 3 टक्के दराने वार्षिक वेतनवाढ व त्यानंतर 3 वर्षानंतरची नियमित वेतनश्रेणी ' 5050-16611/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते, प्रतिवर्षी 3 टक्के दराने वार्षिक वेतनवाढ .

2) व्यवसाय निहाय शैक्षणिक अर्हता व अनुभव ः

| क्र. | व्यवसायाचे नाव कारागिर-क [कनिष्ठ] | शैक्षणिक अर्हता | अनुभव व इतर आवश्यक अर्हता. |
|---|---|---|---|
| 1 | अ] यांत्रिक/मोटार मेकॅनिक/ऑटो मेकॅनिक. ब] वाहनपरिक्षक/ यांत्रिक चालक. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील [आय.टी.आय..] संबंधीत व्यवसायातील पाठयक्रम [परिक्षा] उत्तीर्ण अथवा संबंधीत व्यवसायामधील केंद्रशासनाची अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा [NCTVT] उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाची परिक्षा उत्तीर्ण. | • संबंधीत व्यवसायातील कामाचा 7 वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव. सदर अनुभव आय.टी.आय. उत्तीर्ण झाल्यानंतरचा असावा.<br>• अवजड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>• व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक. |
| 2 | अ]बॉडीफिटर/शिटमेटल. ब]पेंटर/रंगारी/ रंगकार. क]विजतंत्री/ ईलेक्ट्रीशीयन/ऑटो ईलेक्ट्रीशीयन. ड]कथीलगार/ टिनस्मिथ. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील [आय.टी.आय..] संबंधीत व्यवसायातील पाठयक्रम [परिक्षा] उत्तीर्ण अथवा संबंधीत व्यवसायामधील केंद्रशासनाची अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा [NCTVT] उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाची परिक्षा उत्तीर्ण. | • संबंधीत व्यवसायातील कामाचा 7 वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव. सदर अनुभव आय.टी.आय. उत्तीर्ण झाल्यानंतरचा असावा.<br>• व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक. |

3) वयोमर्यादा :-- दिनांक 16/07/2015 रोजी उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी 5 वर्षे शिथिलक्षम. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.तसेच प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे. पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 46 वर्षे राहील. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील. रा.प. कर्मचा-यास कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.

4) उमेदवाराने वरील सर्व अर्हता,दिनांक 16/07/2015 रोजी पुर्ण करणे आवश्यक राहील.

## क) सहाय्यक(कनिष्ठ)

1) वेतनश्रेणी :-- पहिल्या 3 वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी ' 3950-4318/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते, प्रतिवर्षी 3 टक्के दराने वार्षिक वेतनवाढ व त्यानंतर 3 वर्षानंतरची नियमित वेतनश्रेणी ' 4350-14225/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते, प्रतिवर्षी 3 टक्के दराने वार्षिक वेतनवाढ

2) शैक्षणिक अर्हता :-- संबंधित व्यवसायातील शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय.) कोर्स उत्तीर्ण. सदर पदासाठी खालील व्यवसाय (ट्रेड) विहीत करण्यात आले आहेत. 1) मोटार मेकॅनिक, 2) शिट मेटल, 3) इलेक्ट्रीशियन / ऑटो इलेक्ट्रीशियन, 4) ब्लॅकस्मिथ, 5) टीनस्मिथ / वेल्डर, 6) पेंटर 7) डिझेल मेकॅनिक, किंवा या 07 व्यवसायापैकी संबंधीत व्यवसायामधिल केंद्रशासनाची अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा [NCTVT] उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाची परिक्षा उत्तीर्ण.तसेच रा.प धुळे विभागासाठी आवश्यक असे व्यवसाय (ट्रेड) विभागाच्या जागांसमोर दर्शविण्यात आले आहेत. सबब, रा.प धुळे विभागासाठी आवश्यक अशा व्यवसायातील शासनमान्य आय.टी.आय.उत्तीर्ण असणा-या उमेदवारांनीच अर्ज करावेत. रा.प धुळे विभागाच्या गरजेनुसार त्या त्या व्यवसायातील उमेदवारांची एकत्रीतपणे सामाजिक व समांतर आरक्षणानिहाय गुणवत्तेनूसार निवड करण्यात येईल.

3) रा.प.महामंडळातील कार्यशाळा शिकाऊ उमेदवार :--

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये कोणत्याही विभागात / मध्यवर्ती कार्यशाळेत शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारांकरीता सहाय्यक (कनिष्ठ) या प्रवर्गातील भरावयाच्या एकूण पदांच्या संख्येच्या 50 टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, त्यांची निवड लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

4) वयोमर्यादा :--1] दिनांक 16/07/2015 रोजी उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 33 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी 5 वर्षे शिथिलक्षम. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.तसेच प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे. पदवीधारक / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 46 वर्षे राहील. माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील. रा.प. कर्मचा-यास कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.

2] उमेदवाराने वरील सर्व अर्हता दिनांक 16/07/2015 रोजी पूर्ण करणे आवश्यक राहील.

4) भरतीची कार्यपध्दती व निवडीचे निकष : ---

| अ. क्र. | पद | वस्तुनिष्ठ लेखी परीक्षेसाठी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण | व्यवसाय चाचणी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण. | अंतिम निवडीसाठी निकष शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-1011/प्र.क्र.-99/ 11 /13-अ दिनांक 26.12.11 वर आधारित. |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | कारागिर ''क'' (कनिष्ठ) | 100 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br><br>उत्तीर्णतेसाठी किमान 35 टक्के गुण आवश्यक.<br><br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी 30 टक्के पर्यंत शिथिलक्षम. | लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी जात प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार 1:3 प्रमाणात उमेदवारांना शारिरीक क्षमता चाचणी / अर्हताकारी व्यवसाय चाचणीसाठी बोलाविण्यात येईल. या उमेदवारांची 100 गुणांची अर्हताकारी व्यवसाय चाचणी घेण्यात येईल. या चाचणीत उत्तीर्ण होण्याकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान 35 टक्के गुण व पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी सदर उत्तीर्ण गुण मर्यादा 30 टक्के पर्यंत शिथिलक्षम राहील. सदर व्यवसाय चाचणी घेण्यापूर्वी आवश्यक अर्हतेनुसार कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. या पदातील व्यवसाय चाचणी ही अर्हताकारी चाचणी म्हणून उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. | अर्हताकारी व्यवसाय चाचणी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांवर 100 टक्के भारांकावर जात प्रवर्ग निहाय गुणवत्तेनुसार मुलाखत न घेता निवड करण्यात येईल. |
| 2 | सहाय्यक (कनिष्ठ) | 100 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br>उत्तीर्णतेसाठी किमान 35 टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी 30 टक्के पर्यंत शिथिलक्षम. | व्यवसाय चाचणी नाही. | लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या तोंडी मुलाखती न घेता लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांवर 100 टक्के भारांकानुसार जातप्रवर्ग निहाय गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. |

❖ [लेखी परिक्षेचा निकाल तयार करताना परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-2007/प्र.क.46/07/13-अ दिनांक 27 जून 2008नुसार विहीत केलेल्या निकषावर क्रमवार लावलाजाईल.]

(5) <u>उमेदवारांची निवड व नेमणूक :---</u>

अ) लेखी परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

कारागिर ''क'' (कनिष्ठ ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदाच्या लेखी परीक्षेस एकूण 50 प्रश्न असून प्रत्येक प्रश्नाकरीता 02 गुण याप्रमाणे एकूण 100 गुणांसाठीचा कालावधी दिड तासाचा [1तास 30 मिनीटे] राहील. लेखी परीक्षेच्या प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे असतील.

ब) 1. कारागिर ''क'' (कनिष्ठ ) व सहाय्यक (कनिष्ठ)या पदामध्ये कनिष्ठ वेतनश्रेणीत 3 वर्षे करीता नेमणूक देण्यात येईल. या कालावधीमध्ये मूळ वेतनासह नियमानुसार अनुज्ञेय असलेले भत्ते मिळतील. कनिष्ठ वेतनश्रेणीत समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतर संबंधीत पदाच्या नियमित वेतनश्रेणीत सामावून घेण्यात येईल.

| अ. क्र. | पदाचे नांव | अभ्यासक्रम | विषय व गुण | | परिक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कारागिर-क [कनिष्ठ] | अ] लेखी परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल.<br>ब] तांत्रिक ज्ञानासंदर्भातील प्रश्न आय.टी.आय. च्या विविध व्यवसायांकरिता असलेल्या समान अभ्यासक्रमावर (comman syllabus) आधारित असेल. | 1. मराठी | 20 | [1 तास 30 मिनीटे] |
| | | | 2. इग्रजी | 20 | |
| | | | 3. सामान्य ज्ञान | 20 | |
| | | | 4. तांत्रिक ज्ञान | 20 | |
| | | | 5. अंकगणित | 20 | |
| | | | एकुण | 100 | |
| 2 | सहाय्यक [कनिष्ठ] | अ] लेखी परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल.<br>ब] तांत्रिक ज्ञानासंदर्भातील प्रश्न आय.टी.आय. च्या विविध व्यवसायांकरिता असलेल्या समान अभ्यासक्रमावर (comman syllabus) आधारित असेल. | 1. मराठी | 20 | [1 तास 30 मिनीटे] |
| | | | 2. इग्रजी | 20 | |
| | | | 3. सामान्य ज्ञान | 20 | |
| | | | 4. तांत्रिक ज्ञान | 20 | |
| | | | 5. अंकगणित | 20 | |
| | | | एकुण | 100 | |

क) आवश्यकतेनुसार उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधी समाधानकारक पूर्ण न केल्यास पुढील नेमणूका नाकारण्याचा रा.प. महामंडळास अधिकार राहील.

(6) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना :---

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| 1. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | 10/06/2015 | 10/07/2015 |
| 2. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया [SBI] यांच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | 12/06/2015 | दिनांक 14/07/2015 रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत |
| 3. | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक 14/07/2015 पर्यंत शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी स्टेट बँक इंडियाच्या शाखेकडून देण्यात आलेला Transaction ID अर्जामध्ये नमूद करुन ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख. | 16/07/2015 रोजी रात्रौ 11.59 वाजेपर्यंत. | |
| 4. | अर्जामध्ये दुरुस्तीसाठीचा कालावधी या कालावधीत अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी उमेदवारास एकदाच संधी देण्यात येईल त्यावेळी उमेदवार अर्जामध्ये दुरुस्ती करु शकतो त्याबाबत सविस्तर सूचना या कालावधीत संकेत स्थळावर उपलब्ध होतील. | दिनांक -17/07/2015 ते दि. 23/07/2015 रोजी रात्रौ 11.59 वाजेपर्यंत. | |
| 5. | चलन बॅकेत भरणा करण्याचा दिनांक (ज्या उमेदवारांनी मागास प्रवर्गातून खुला प्रवर्गात बदल केला आहे अशा उमेदवारांसाठी उर्वरित फी भरण्याची अंतिम दिनांक) | दिनाक 27/07/2015 पर्यत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत. | |
| 6. | ज्या उमेदवारांनी बॅकेमध्ये दिनांक27/07/2015 पर्यत शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी SBI शाखेकडून देण्यात आलेला Transaction ID अर्जामध्ये नमुद करुन ऑन लाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दिनांक- 28/07/2015 रोजी रात्रौ 11.59 वाजेपर्यत. | |
| 7. | भरतीचा प्रस्तावित कार्यक्रमः- | | |
| | 1. लेखी परीक्षा दिनांक | अंदाजे ऑगस्ट 2015 | |
| | 2. लेखी परिक्षेचा निकालाचा दिनांक | अंदाजे सप्टेंबर 2015 | |
| | 3. व्यवसाय चाचणी दिनांक | अंदाजे सप्टेंबर 2015 | |
| | 4. निवडयादी जाहीर दिनांक | अंदाजे ऑक्टोबर 2015 | |
| | 5. प्रशिक्षण व नियुक्ती कालावधी | अंदाजे ऑक्टोबर 2015 | |

अर्ज नोंदणी केल्यानंतर दुस-या दिवशी बँकेमध्ये चलनाद्वारे भरती प्रक्रिया शुल्क भरावे.

भरती प्रक्रिया शुल्क :जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व पदांसाठी भरती प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे. सदरचे शुल्क खुल्या प्रवर्गाकरीता रु.300 /- व मागास प्रवर्गाकरीता रु.150/- असे राहील. तसेच बँकेचा आकार (बँक चार्जेस) उमेदवाराने स्वतः भरावयाचा आहे.

(7) ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत.

1. प्रस्तुत परिक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.
2. उमेदवारानी वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज www.mahast.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.
3. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर(DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच, ई-मेल आयडी व मोबाईल संदेशवहनात येणा-या तांत्रिक अडचणींना रा.प.महामंडळ जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
4. उमदेवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि,ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमदेवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच,ऑनलाईन अर्ज भरुन सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर व सदर अर्ज ग्राहय (Validate) झाल्यानंतर सदर अर्जातील भरलेल्या माहितीमध्ये कोणताही फेरबदल केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना जाहिरात काळजीपूर्वक वाचून अर्ज भरणे आवश्यक आहे. लेखी परिक्षेचा निकाल उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना भरलेल्या माहितीवर आधारित तयार करण्यात येणार असून, चुकीची माहिती भरल्यास निकालामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. अर्ज बिनचुक भरण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

   उमेदवारांनी अर्ज ऑन लाईन भरताना चुकीची माहिती भरल्याने (उदा - उमेदवाराचे नाव, जात,पुरुष अथवा स्त्री जन्मतारीख इत्यादी. बाबतची माहिती ) अर्जदाराची झालेली निवड रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही अर्ज अथवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही.
5. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमदेवाराजवळ स्वतःचा अद्ययावत विहित पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन www.mahast.in या संकेतस्थळावरील सूचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना फोटोची साईज 5 केबी ते 100 केबी व सहीची साईज 5केबी ते 50 केबी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी परिक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.
6. उमेदवारांची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे, या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमदेवारांची निवड निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार रा.प.महामंडळाने राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमदेवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
7. अ] ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सूचना www.mahast.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवाराने www.mahast.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जातील संपूर्ण

माहिती भरल्यानंतर उमेदवारास Apllication ID सह स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत भरतीप्रक्रीया शुल्क भरण्याचे चलन तीन प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत आणि रा.प.महामंडळाची प्रत) उपलब्ध होईल.

ब] सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेले भरतीप्रक्रीया शुल्क चलनामध्ये नमूद केलेल्या सूचनानूसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरणा करावे. व सदर शाखेकडून [बँकेकडून] चलनावर रक्कम जमा झालेबाबत Transaction ID नमूद केला जाईल. चलनाच्या तीन प्रतिपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत व रा.प.महामंडळाची प्रत शाखेकडून [बँकेकडून] परत देण्यात येईल.

क] त्यानंतर सदर उमेदवारास भरती प्रक्रिया शुल्क जमा झाल्याबाबतचा SMS येईल. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये भरती प्रक्रिया शुल्क जमा केले म्हणजे लेखी परीक्षेसाठी अर्ज पात्र ठरला असे गृहीत धरण्यात येऊ नये.

ड] भरती प्रक्रिया शुल्क जमा झाल्याबाबतचा SMS आल्यानंतरच उमेदवारांने त्याला मिळालेल्या Application ID वरुन आपला प्राथमिक अर्ज पुन्हा उघडून अर्जामध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखेकडून देण्यात आलेला Transaction ID नमूद करावा. त्यानंतर उमेदवाराने सदर अर्जाची प्रिंट काढावी. सदर अर्जाची प्रत व चलन भरल्याची रा.प.महामंडळाची प्रत कागदपत्र छाननीचे वेळी रा.प.महामंडळाकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर अर्जाची व चलनाची मूळ प्रत जमा केल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी केली जाणार नाहीत.

8. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरलेनंतर त्याची स्थिती www.mahast.in वर पाहता येऊ शकेल.

9. उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये उमेदवारास काही दुरुस्ती करावयाची असल्यास (उदा.उमेदवाराचे नाव, जात, पुरुष अथवा स्त्री, मोबाईल क्रमांक, जन्मतारीख यासारख्या) उमेदवार संकेतस्थळावर दिनांक 17/07/2015 ते 23/07/2015 या कालावधीत दुरुस्ती करु शकतो. सदर दुरुस्तीची संधी उमेदवारास या कालावधीत फक्त एकदाच देण्यात येईल. यानुसार उमेदवार अर्जामध्ये कोणतीही दुरुस्ती करु शकतो. याकरीता उमेदवारास वेळोवळी संकेतस्थळावर तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबतची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. सदर कालावधी संपल्यानंतर अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

10. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित भरती प्रक्रिया शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती/ परीक्षा प्रवेशपत्र/ वेळापत्रक/ परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक/व्यवसाय चाचणीबाबतचा तपशील इत्यादीबाबतची माहिती तसेच उपरोक्त निकषांनुसार प्राथमिक छाननीसाठी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी) पात्र ठरलेल्या व त्यानंतर प्राथमिक छाननीअंती व्यवसाय चाचणीसाठी (Trade Test) पात्र ठरलेल्या उमेदवारांची माहीती व चाचणीचे ठिकाण इ. बाबतची माहिती वर दिलेल्या संकेत स्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच एसएमएस / ई-मेलद्वारे सूचित करण्यात येईल. अन्य कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

11. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर www.mahast.in या संकेतस्थळावरुन परिक्षेचे प्रवेशपत्र विहित नमूद कालावधीत डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परिक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

12. उमेदवार एकापेक्षा जास्त पदांची अर्हता पूर्ण करित असल्यास, सदर उमेदवार एकच अर्जान्वये एकापेक्षा जास्त पदांची निवड करु शकेल. परंतु प्रत्येक पदासाठी स्वतंत्र्य भरती प्रक्रीया शुल्क भरणे आवश्यक राहील.तसेच प्रत्येक पदासाठी स्वतंत्र परिक्षा घेण्यात येईल.

13. उमेदवाराच्या मदत व माहितीकरिता संस्थेचा दूरध्वनी क्रमांक 7774060901 या प्रमाणे आहे. सदर दूरध्वनी क्रमांक हे कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील.

14. उमेदवाराने अर्जासोबत लहान कुटुंबाची माहिती भरणे अनिवार्य राहील.

## (8) महत्वाच्या सूचना :---

1. i) उमेदवारांची लेखी परिक्षेची तारीख, वेळ व ठिकाण इत्यादी बाबतची माहिती sms /e-mail द्वारे कळविण्यात येईल.

   ii) लेखी परिक्षा/व्यवसाय चाचणी प्रक्रियेदरम्यान उमेदवारांस शारिरीक दुखापत झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारच्या नूकसानीस रा.प. महामंडळ जबाबदार राहणार नाही.

2. लेखी परीक्षेतील गुणानुक्रम व आरक्षण विचारात घेऊन, प्राथमिक छाननीकरीता (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी)/व्यवसाय चाचणी करीता पात्र झालेल्या उमेदवारांची नावे महामंडळाच्या www.mahast.in या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येतील.

3. उपरोक्त पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शारिरीक पात्रता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या केवळ गुणांच्या आधारे उमेदवारांला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवार उपरोक्त नमूद केलेल्या निवडीच्या निकषांनुसार पात्र ठरत असल्यासच गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

4. उपरोक्त पदातील उमेदवारांनी अर्जामध्ये व्यवसाय [ट्रेड] नमूद करणे आवश्यक आहे. व्यवसाय [ट्रेड] नमूद केलेला नसल्यास उमेदवाराचा अर्ज बाद ठरविण्यात येईल.

5. उमेदवार अर्ज केलेल्या पदासाठीची विहित अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे आढळून आल्यास त्याचा/ तिचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल.

6. ''जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र'' या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तर त्याचा तपशील अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. तसेच वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

7. शासकीय,निमशासकीय,शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्या सेवेतील कर्मचा-याने वर नमूद केलेल्या पदांकरीता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचा-याला खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र (No objection Certificate)अंतीम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. रा.प.महामंडळातील कर्मचा-याची निवड व नेमणूक झाल्यास त्याचे रा.प.नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल.समान पदाकरिता अर्ज करणा-या रा.प. कर्मचा-याची सेवा व वेतन संरक्षित केले जाणार नाही.

8. जाहिरातीत नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.mahast.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

9. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

10. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी (Mobile)अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

11. शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-2002/प्र.क्र.68/क्रि.युसे-2, दि.3.4.2005 मधील तरतुदीनुसार गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्याची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

12. विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या - त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतर परिवर्तनीय आहे.

13. अ) इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या वेळी व प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी) वैध (Valid) असलेले सादर करणे आवश्यक आहे. सदर उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र [नॉन क्रिमीलेअर दाखला] जाहिरातीच्या दिनांकाच्या आर्थिक वर्षाचे असणे आवश्यक आहे.

ब) इमाव, भज-क व भज-ड आणि खुल्या गटातील महिलांना 30 टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध (Valid) प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या वेळी व प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी) सादर करणे आवश्यक आहे. सदर उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र [नॉन क्रिमीलेअर दाखला] जाहिरातीच्या दिनांकाच्या आर्थिक वर्षाचे असणे आवश्यक आहे.

क) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असुन, ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील.

14. मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागेवर निवड झालेल्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक 12 डिसेंबर, 2011 नुसार जात पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधीत उमेदवाराची जबाबदारी राहील.

15. लेखी परीक्षेतील गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी) कागदपत्र तपासणी करतांना शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, समांतर आरक्षणासंबंधी, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र, लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ.) यांचेकडील सार्वजनिक अवजड वाहन चालविण्याचा वैध परवाना व अनुभवाचा दाखला तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या मूळ व साक्षांकित प्रती (Attested copies) प्राथमिक छाननीच्यावेळी (कागदपत्र पडताळणी व शारीरीक अर्हता तपासणी) सादर करणे आवश्यक राहील.

16. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे. जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या जागा विभागातील भविष्यातील निकड लक्षात घेवून दर्शविण्यात आलेले आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना रा.प.महामंडळाच्या आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार नेमणूका देण्यात येतील.

17. सदर भरती प्रक्रिया पूर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

18. वर नमुद केलेल्या पदांची लेखी परीक्षा झाल्यानंतर प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल. याबाबत उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळावर तपासणी करणे आवश्यक आहे. उत्तरतालिके संदर्भात काही आक्षेप असल्यास त्याबाबत संकेतस्थळावर विहीत केलेल्या कालावधीमध्ये त्याचे निरसन करण्यात येईल. विहीत कालावधीनंतर संकेतस्थळावर अथवा लेखी स्वरूपात आलेल्या कोणत्याही तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

विभाग नियंत्रक

रा.प.धुळे.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धुळे विभाग, धुळे

## <u>प्रकटन</u>

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धुळे विभागाकरीता कारागीर-क [कनिष्ठ] व सहाय्यक [कनिष्ठ] या पदांसाठी उमेदवारांची भरती करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने www.mahast.in या संकेतस्थळावर सविस्तर जाहिरात व सूचना प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.सदर सूचना अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचे असून अर्जाची नोंदणी करण्याची शेवटची दिनांक 10/07/2015 अशी आहे. तरी उमेदवारांनी त्यांचे अर्ज परिपूर्ण माहिती देवून दि.10/07/2015 पर्यंत नोंदवावेत. उमेदवारांनी वरील पदांसाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता व इतर अटींची पूर्तता दि.16/07/2015 रोजी पूर्ण करणे आवश्यक आहे. अशी पूर्तता न करू शकणा-या उमेदवारांचे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम जाहिराती सोबत जोडला आहे. त्यानुसार उमेदवारांनी लेखी परीक्षेची तयारी करावी.

कारागीर-क [कनिष्ठ] व सहाय्यक [कनिष्ठ] या पदांसाठी मुलाखत न घेता 100 टक्के भारांक [वेटेज] लेखी परीक्षेतील गुणांना देवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. रा.प.महामंडळातर्फे राबविण्यात येणारी भरती प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शक असून ती पूर्णतः गुणवत्तेवर आधारीत आहे.

उमेदवारांनी त्यांच्या निवडी संदर्भात कोणताही दबाव आणण्याचा अथवा इतरांमार्फत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यास किंवा कोणत्याही अनुचित प्रथेचा अवलंब केल्यास अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल व त्यांच्या विरूध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

उमेदवारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये व सदरची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे व गुणवत्तेनुसारच पार पाडण्यात येत आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

विभाग नियंत्रक,
रा.प.धुळे